# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्र.
०२०–२५६२१०५०
ई–मेल
iqac@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष


संदर्भ क्र.:आयक्युएसी/ दि : १३/०२/२०२३

**अत्यंत महत्त्वाचे व तातडीचे**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/विद्यापीठ उपकेंद्र,
प्रस्तुत विद्यापीठ/**(पुणे शहर, पुणे ग्रामीण, अहमदनगर आणि नाशिक).**

**विषय : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची प्रभावी अंमलबजावणीबाबत मार्गदर्शनपर एकदिवसीय कार्यशाळेबाबत...**

**संदर्भ : महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१ यांचे जा.पत्र क्र. युएनआय/(१३६/२२)/विशि–१/६५९, दि. २५ जानेवारी, २०२३**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भाकिंत विषयास अनुसरुन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यातील प्रभावी अमंलबजावणीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचे ठरले आहे. उपरोक्त पत्रातील आशय स्वयंस्पष्ट असून त्यानुसार प्राप्त आदेशानुसार **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणीबाबत उपरोक्त संबंधित महाविद्यालयातील मा. समन्वयक/नोडल अधिकारी/महाविद्यालयाचे प्रतिनिधी यांना मार्गदर्शन करण्यासाठी कार्यशाळा** खालीलप्रमाणे नमूद केलेल्या ठिकाणी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली आहे. तरी, आपली उपस्थिती अनिवार्य आहे :

| अ. क्र. | कार्यशाळेचे ठिकाण | वार व दिनांक | वेळ | गट |
|---|---|---|---|---|
| १. | महात्मा गांधी विद्या मंदिराचे, लोकनेते व्यंकटराव हिरे ऑर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज. पंचवटी, नाशिक –४२२००३ | सोमवार, २०/०२/२०२३ | सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० वाजेपर्यत | नाशिक जिल्हयातील सर्व महाविद्यालयांसाठी |
| २. | अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, न्यू ऑर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, लाल टाकी रोड, अहमदनगर जि. अहमदनगर – ४१४००१ | बुधवार, २२/०२/२०२३ | सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० वाजेपर्यत | अहमदनगर जिल्हयातील सर्व महाविद्यालयांसाठी |
| ३. | शिरुर शिक्षण प्रसारक मंडळाचे, चांदमल ताराचंद बोरा ऑर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, ता. शिरुर, जि. पुणे – ४१२२१० | गुरूवार, २३/०२/२०२३ | सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० वाजेपर्यत | पुणे जिल्हयातील ग्रामीण महाविद्यालयांसाठी |
| ४. | खडकी एज्युकेशन सोसायटीचे, टिकाराम जगन्नाथ ऑर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, खडकी, पुणे – ४११००३. | शुक्रवार, २४/०२/२०२३ | सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० वाजेपर्यत | पुणे शहरातील महाविद्यालयांसाठी |

सदर कार्यशाळेत मा. श्री. आनंद मापुस्कर, मा. शिक्षण संशोधक तज्ज्ञ आणि करिअर सल्लागार, मुंबई आणि मा. प्रा. बी. एन. जगताप, आय. आय. टी. पवई, मुंबई. तसेच, प्रस्तुत विद्यापीठाचे मा. कुलगुरू, मा. प्र—कुलगुरू आणि संचालक, अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष यांचे मार्गदर्शन उपस्थित मान्यवरांना लाभणार आहे.

कळावे,

(प्रा. डॉ. संजय ढोले)
संचालक

सोबत : संदर्भासाठी शासनाचे परिपत्रक जोडलेले आहे.
तसेच, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणीबाबतचे ठळक मुद्दे.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च शिक्षण संचालनालय**
**मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१**

Web : www.dhepune.gov.in E-mail:director.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९


क्रमांक-युएनआय/(१३६/२२)/विशि-१ ६५८ दि. 25 JAN 2023

**महत्वाचे/कालमर्यादित**

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

२ प्र-कुलगुरु,
सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य

**विषय राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने गठीत उपसमित्यांच्या अहवालातील शिफारशीच्या अंमलबजावणीसंदर्भात आढावा घेऊन येणाऱ्या अडचणी निवारणासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी व मार्गदर्शन करणेसाठी गठीत करण्यात आलेल्या सुकाणू समितीच्या दि.२३-२४ जानेवारी, २०२३ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत.**

संदर्भ शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/विशि-३ शिकाना दि.२६ डिसेंबर, २०२२

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन निर्णयान्वये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने गठीत उपसमितीच्या अहवालातील शिफारसीच्या अंमलबजावणीसंदर्भात आढावा घेऊन येणाऱ्या अडचणी निवारणासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी व मार्गदर्शन करणेसाठी संदर्भिय शासन निर्णयान्वये सुकाणू समिती गठीत करण्यात आलेली आहे.

या समितीची बैठक दि.२३-२४ जानेवारी, २०२३ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे आयोजित करण्यात आलेली होती. या बैठकीमध्ये राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठांचे प्र-कुलगुरु व सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता उपस्थित होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची प्रभावी अंमलबजावणी २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून करावयाची असल्यामुळे यासंदर्भात बैठकीत झालेल्या चर्चेनुसार खालीलप्रमाणे

कार्यवाही करण्याचे ठरले असून खालीलप्रमाणे करावयाच्या कार्यवाहीची सर्वस्वी जबाबदारी सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण व प्र-कुलगुरु, संबंधित अकृषि विद्यापीठ व सर्व अधिष्ठाता यांची राहील.

कार्यवाहीची रुपरेषा खालीलप्रमाणे राहील.

१. विभागातील व विद्यापीठ परिक्षेत्रातील अधिनस्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांपैकी प्रत्येकी एक महाविद्यालय खालील नमूद गटातून (शहरी व ग्रामीण/डोंगराळ व आदिवासी क्षेत्र इ.चे प्रतिनिधीत्व करणारे तसेच अनुदानित पदवी व पदव्युत्तर, अनुदानित पदवी, अनुदानित पदवी आणि कायम विनाअनुदानित पदव्युत्तर) अशा महाविद्यालयाची निवड संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु, प्र-कुलगुरु, अधिष्ठाता व संबंधित विभागाचे विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी **दि.३१ जानेवारी, २०२३ पर्यत** करावीत.

- बहुविद्याशाखीय महाविद्यालये(कला, वाणिज्य व विज्ञान)
- एकल विद्याशाखीय
- अनुदानित विधी महाविद्यालय
- अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालय
- अनुदानित स्वायत्त महाविद्यालय

२. वर नमूद केलेल्या विद्याशाखेच्या गटनिहाय महाविद्यालयांची निवड केल्यानंतर संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना त्यांच्या महाविद्यालयात दि.०८ फेब्रुवारी, २०२३ पर्यंत डॉ.आर.डी.कुलकर्णी समितीच्या अहवालातील शिफारसींनुसार तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.१२ डिसेंबर, २०२२ च्या Curriculum and Credit Framework for UG Programms या मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन पदवी व पदव्युत्तर स्तराचा अभ्यासक्रम रचना (Major, Minor Disipline Specific, Core/Elective options इ.ग्राहय धरुन) श्रेयांक पध्दती ( ३ वर्षीय पदवी अभ्यासक्रमासाठी १२० ते १४० क्रेडीटस या मर्यादेत व ४ वर्षीय पदवी अभ्यासक्रमासाठी १६० ते १८० क्रेडीटस या मर्यादेत), तसेच सध्या अस्तित्वात असलेले ४८/५० मिनिटाची तासिका ६० मिनिटामध्ये रुपांतरीत केल्यास कार्यभारात होणारा बदल (+/-) इ.चा प्रारुप आराखडा बाबत चर्चा करुन कच्चा मसुदा तयार करावा.

३. संबंधित विद्यापीठाच्या मा.कुलगुरु, प्र-कुलगुरु, अधिष्ठाता व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी निवड केलेल्या सर्व संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांची, महाविद्यालयाचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात नेमलेले नोडल ऑफीसर यांची एकत्रित निवासी कार्यशाळा (०१ ते ०२ दिवसीय) दि.०८ ते १६ फेब्रुवारी, २०२२ या कालावधीत आयोजित करावी. या निवासी कार्यशाळेत संबंधित

महाविद्यालयाने तयार केलेल्या कच्चा मसुद्यावर सर्वंकष चर्चा करुन उपरोक्त उल्लेखित बाबींचा प्रारुप आराखडयास अंतरिम स्वरुप द्यावे.

४. दि.०८ ते १६ फेब्रुवारी, २०२२ दरम्यान विद्यापीठातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या सदरच्या निवासी कार्यशाळेत संदर्भिय शासन निर्णयात नमूद केलेल्या सुकाणू समितीमधील खालील सदस्यांना विद्यापीठनिहाय निमंत्रित करण्यात यावे. निवासी कार्यशाळेची तारीख संबंधित सुकाणू समिती सदस्यांची चर्चा करुनच अंतिम करावी.

| अ.क्र. | सुकाणू समिती सदस्यांचे नांव | विद्यापीठाचे नांव |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | डॉ.नितीन करमळकर, समिती अध्यक्ष तथा माजी कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | १. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर<br>२.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर |
| २ | डॉ.मुरलीधर चांदेकर, माजी कुलगुरु, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | १.कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव |
| ३ | डॉ.विलास सपकाळ, कुलगुरु, एमजीएम विद्यापीठ, औरंगाबाद | स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड |
| ३ | डॉ.व्ही.एल माहेश्वरी, कुलगुरु, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव | १.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर<br>२.गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली. |
| ४ | डॉ.जोगेंद्रसिंग बिसेन, प्र-कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | संत गाउगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती |
| ५ | १.डॉ.आर.डी.कुलकर्णी, माजी प्र-कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई<br>२.श्री.महेश दाबक, उद्योजक नाशिक<br>३.डॉ.प्रशांत मगर, प्राध्यापक,शा.वि. ज्ञा.वि.संस्था, अमरावती | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे |
| ६ | डॉ.अजय भामरे, प्रभारी प्र-कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई | १.डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद<br>२.श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई |
| ७ | डॉ.श्री.माधव एन वेलिंग, अध्यक्ष एस.व्ही.के.एम यांचे सल्लागार व प्र-कुलगुरु एन.एम.आय.एम.एस.मुंबई | मुंबई विद्यापीठ, मुंबई |

सर्व संबंधित विद्यापीठांनी आपले विद्यापीठ विभाग (खुद्द) आणि विद्यापीठ प्रशाला(स्कुल्स) यांचेही प्रातिनिधिक प्रारुप आराखडा वरील वेळापत्रकाप्रमाणे व कार्यवाहीप्रमाणे तयार करावा.

महाविद्यालयांचा तयार केलेला अंतरिम प्रारुप आराखडा व विद्यापीठांनी विद्यापीठ विभाग (खुद्द) आणि विद्यापीठ प्रशाला(स्कुल्स) साठी तयार केलेला अंतरिम प्रारुप आराखडा या संचालनालयास दि.२० फेब्रुवारी, २०२३ पर्यंत हस्तपोच दोन प्रतीत तसेच सॉफ्ट कॉपीमध्ये खास दूतामार्फत या संचालनालयास विद्यापीठाने सादर करण्यात यावा. या संदर्भात सुकाणू समितीची पुढील बैठक दि.२७-२८ फेब्रुवारी, २०२३ रोजी राज्यातील सर्व विद्यापीठांच्या प्र-कुलगुरुंसोबत प्रस्तावित असल्याने सदरचा प्रारुप आराखडा (Proto Type Model) तयार करण्याबाबत सर्व प्र-कुलगुरु, अधिष्ठाता व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी व्यक्तिश: दक्षता घ्यावी.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाने डॉ.आर.डी.कुलकर्णी समितीचा अहवाल सर्व अकृषि विद्यापीठे यांना अंमलबजावणीसाठी पाठविलेला आहे. सर्व संबंधित घटकांनी सदर अहवालाचा अभ्यास करुन काही प्रश्न असतील तर सदरचे प्रश्न सुकाणू समिती सदस्य डॉ.आर.डी.कुलकर्णी यांना त्यांचा ई-मेल rd.kulkarni@ictmumbai.edu.in वर दि.१० फेब्रुवारी, २०२३ पर्यंत पाठवावेत.

या संदर्भात विद्यापीठामध्ये आयोजित निवासी कार्यशाळेसाठी जे सुकाणू समिती सदस्य उपस्थित राहतील त्यांचे प्रवासभत्ता व मानधन विद्यापीठाने विद्यापीठ निधीतून त्यांचे नियमानुसार अदा करावा.

**(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

**प्रत माहितीस्तव सादर**
१.मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
२.सर्व सुकाणू समिती सदस्य

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी**
२. बॅक ऑफीस टिम.

## राष्ट्रीय शिक्षण धोरण – अंमलबजावणी कार्यशाळा

राष्ट्रीय शिक्षण धोरणान्वये उच्च शिक्षणामध्ये अनेक महत्त्वपूर्ण बदल होणार आहेत. उच्च शिक्षण संस्थांच्या रचनेतील बदल, अभ्यासक्रमातील बदल, एकाच वेळी विविध संस्थांमधून विविध पाठ्यक्रमांची निवड करण्याची संधी यासारखे अनेक बदल येणा-या वर्षामध्ये झालेले दिसतील. या बदलांच्या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने गेल्या वर्षभरापासून काही विनिमय (रेग्युलेशन) व मार्गदर्शक सूचना (गाईडलाईन्स) प्रकाशित केल्या आहेत. राज्य सरकारने देखील विविध समित्यांच्या माध्यमातून राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीसाठी पाऊले उचलली आहेत. विविध शिक्षणसंस्थांमध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीबाबत विचार चालला असेल.

राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार आपल्या महाविद्यालयाचे नियोजन करण्याच्या दृष्टीने या कार्यशाळेचा उपयोग होईल.

कार्यशाळेतील विषय –

१) **उच्च शिक्षणातील रचनात्मक बदल** – राष्ट्रीय शिक्षण धोरणाप्रमाणे विद्यापीठाला संलग्नित महाविद्यालये ही संकल्पना जाऊन त्याऐवजी विविध प्रकारच्या बहुशाखीय शिक्षण संस्थांच्या माध्यमातून शिक्षण देण्याची कल्पना मांडण्यात आली आहे. हे काम २०३० सालापर्यंत करावयाचे आहे. तीन प्रकारच्या विद्यापीठांची कल्पना राष्ट्रीय शिक्षण धोरणात मांडण्यात आली आहे. आपल्या महाविद्यालय वा शिक्षण संस्थेला बहुशाखीय शिक्षण संस्था (Multi-disciplinary Higher Education Institute) बनण्यासाठी नेमके काय करावे लागेल याबाबत या सत्रामध्ये मार्गदर्शन केले जाईल.

२) **उच्च शिक्षण अभ्यासक्रमातील बदल** – १२ डिसेंबर २०२२ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने Curriculum and Credit Framework For Undergraduate Programmes प्रकाशित केले असून या फ्रेमवर्कप्रमाणे अभ्यासक्रमाच्या रचनेमध्ये बदल करायला विद्यापीठे तसेच महाविद्यालयांना सूचित केले आहे. नवीन क्रेडिट फ्रेमवर्क नुसार अभ्यासक्रमांची रचना कशी करायची याबाबत मार्गदर्शन या सत्रामध्ये केले जाईल.

३) **शिकवण्याच्या अभिनव पध्दती** – राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये शिक्षण देण्याच्या पध्दती तसेच परीक्षा (मूल्यमापन) पध्दतीमध्ये आमूलाग्र बदल सुचवण्यात आले आहे. केवळ वर्गामध्ये उभे राहून शिकवणे याव्यतिरिक्त अन्य पध्दतींचा वापर करण्याबाबत सांगितले आहे. प्रात्यक्षिके

तसेच अनुभवातून शिकण्यावर देखील भर देण्यांत आला आहे. या सत्रामध्ये शिकवण्याच्या अभिनव पध्दती यावर मार्गदर्शन करण्यात येईल.

४) **मूल्यमापनातील सुधारणा** - विद्यार्थ्यांचे केवळ वार्षिक परीक्षेद्वारे मूल्यमापन न करता मूल्यमापनाच्या देखील विविध पध्दतींचा विचार करता येईल. मूल्यमापनातील सुधारणा यावर मार्गदर्शन करण्यात येईल.

५) **संस्थेचा विकास आराखडा** – विद्यापीठांच्या बृहत विकास आराखड्याच्या संकल्पनेप्रमाणे महाविद्यालयांनी देखील पंचवार्षिक विकास आराखडा बनवणे अपेक्षित आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाप्रमाणे अपेक्षित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पायाभूत सुविधा, अभ्यासक्रम बदल, शिक्षक प्रशिक्षण, उद्योगक्षेत्राशी साहचर्य, समाजातील विविध घटक, स्वयंसेवी संस्था, स्थानिय स्वराज्य संस्था, शासनाचे विविध विभाग यांच्याशी साहचर्य, संशोधन, उद्योजकता विकास, क्रीडा, कौशल्य विकास प्रशिक्षण आदीचा विचार करुन पंचवार्षिक योजना तयार करणे अपेक्षित आहे. पंचवार्षिक योजना तयार करण्याच्या दृष्टीने या सत्रामध्ये मार्गदर्शन केले जाईल.

६) **राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये विविध शैक्षणिक घटकांची भूमिका** –
राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीसाठी संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी या प्रत्येक घटकाची भूमिका महत्त्वाची आहे. प्रत्येक घटकाने धोरणाच्या अनुषंगाने मानसिकता बदलणे आवश्यक आहे. प्रत्येक घटकाकडून नेमके कोणते बदल अपेक्षित आहेत याबाबत या सत्रामध्ये मार्गदर्शन केले जाईल.